IIP: WJHSS
IIP World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# स्थलांतर, शहरीकरण आणि मानसिक समस्या

## (Migration, Urbanization and Psychological Issues)

**सहा. प्रा. राजेंद्रकुमार नरसिंग डांगे**

विश्वासराव रणसिंग महाविद्यालय, कळंब- वालचंदनगर.

**Article Info**

***Article History:***

Received: 15th Dec 2025

Accepted: 18th Dec 2025

Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*जीवनमान संघर्ष, मानसशास्त्रीय घटक, मानसिक समस्या*

**ABSTRACT**

ग्रामीण भागातून नागरी भागात जे स्थलांतर होते. त्यामुळे नागरिकांना प्रश्न भीषण होत आहे. जगभरातील नागरीकरणाचा वेग हा पर्यावरणात्मक दृष्ट्या घातक आहे. यामुळे लोकसंख्येचा गुणात्मक रास होताना दिसतो. जीवनमान संघर्ष मय होते. तीव्र स्पर्धा निर्माण होत असते आणि कळत नकळत अवैद्य मार्गाचा स्वीकार केला जातो. याचा परिणाम व्यक्ती तणावाखाली येऊ लागते. सांस्कृतिक मूल्य ढासळताना दिसतात. अतिरेकी प्रवृत्ती बळावतात अशांतता अशा सारख्या समस्या वाढतात आणि शहरांमध्ये मन- शांतीचा अभाव प्रत्येकाला जाणवतो. औदासीन्या सारखा मानसशास्त्रीय घटक नागरी वस्त्यांमध्ये आढळतो.

***Plagiarism Check Report:***

Date of Report: Dec 17, 2025

Similarity Index: 3%

Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Dange, R. N. (2025). स्थलांतर, शहरीकरण आणि मानसिक समस्या (Migration, Urbanization and Psychological Issues). *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 1(VI), 2369–2373.

**संशोधन उद्दिष्टे**

1. स्थलांतराने शहरांमध्ये निर्माण झालेल्या समस्या मागील कारणांचा शोध घेणे.
2. स्थलांतराने शहरांमध्ये जाणवणाऱ्या मानसिक समस्येचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला असून त्यामध्ये प्रकाशित अप्रकाशित लिखाण संदर्भ ग्रंथ नियतकालिके साप्ताहिके यांचा वापर केला आहे.

विशेषतः ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतरित होण्याचा ओघ अधिक आहे. ग्रामीण भागात बेकारांचे प्रमाण अधिक असल्याने कामासाठी शहराकडे जाणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे उत्तर प्रदेश आणि बिहार या ठिकाणचे स्थलांतर ही स्थलांतराची उत्तम उदाहरणे आहेत भारतातील प्रायोगिक संशोधनात अशी आढळून आले आहे की स्थलांतरामागे सामाजिक आणि आर्थिक घटक कारणीभूत असतात तसेच स्थलांतरामागे आणखी एक घटक आढळला तो म्हणजे कर्जफेड विशेषता विशिष्ट हंगामात काम करणारे कामगार कर्जफेडी करता स्थलांतर करतात स्थलांतरावर नियंत्रण आणून किंवा रोजगार संधी वाढवून स्थलांतराचा रोग कमी करता येतो त्यामुळे नागरी समस्यांचे प्रमाण कमी होऊन प्रादेशिक विकासाचे संतुलन राखता येते सक्सेना यांनी असे म्हटले की स्थलांतरामुळे अस्पृश्यता आरोग्य आणि शिक्षणाबाबतच्या अभिवृत्तित बदल होतो मुजुमदार यांनी 1978 मध्ये दिल्लीतील झोपडपट्टीत राहणाऱ्या स्थलांतरित लोकांमधील बदलाचे विश्लेषण केले तेव्हा अशी आढळले की साधारणपणे स्थलांतर केलेल्या लोकांमध्ये आपल्या खेडेगावातील यंत्रणेची वैशिष्ट्ये आणि विश्वास राखून ठेवण्याची वृत्ती आढळते खेडे गावच्या रीती टिकून धरण्याची व्यक्ती असल्याने शहरांमध्ये आणखी भेद निर्माण होतात शहरात जात आणि भौगोलिक परिसरानुसार वेगवेगळे गट संघटित होण्याची शक्यता असते याशिवाय शहरावरील जो ताण वाढतो म्हणून विविध व्यवसाया बाबत असणाऱ्या सहिष्णुतेला धक्का बसण्याची शक्यता आहे निकृष्ट प्रतीच्या परिस्थितीत अनेकांमधील आक्रमकता गर्दीमुळे वाढते त्याचप्रमाणे स्वतःबद्दल आणि जगाबाबत प्रतिकूलता निर्माण होते.

**नागरीतणाव:-**

आधुनिक मोठ्या शहरांची जशी धन बाजू आहे तशीच काही ऋणबाजू देखील आहे. अति लोकसंख्या वाढ कोलाहल आणि गर्दी यांचा मानसिक स्वास्थ्यावर आरोग्यावर आणि सामाजिक वर्तनावर विपरीत परिणाम होतो.

**व्याख्या:-**

"स्थलांतर म्हणजे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे"

स्थलांतरामध्ये ग्रामीण ते शहरी स्थलांतर हा एक मुख्य प्रकार आहे.

**शहरीकरण:-**

शहरीकरण म्हणजे ग्रामीण भागातून शहराकडे होणारे लोकांचे स्थलांतर आणि त्यामुळे शहरांची वाढ होणारी प्रक्रिया होय.

शहरीकरणात शहरे आणि महानगरामध्ये राहणाऱ्या लोकांच्या संकेत वाढ होते तसेच शहरीकरण म्हणजे शहरामध्ये राहण्यासाठी जाण्याची प्रक्रिया होय त्यामुळे शहरे आणि महानगरी मोठे होतात हे प्रामुख्याने चांगल्या रोजगाराच्या संधी शिक्षण आणि आरोग्य सेवा सारख्या आर्थिक आणि सामाजिक घटकामुळे होते यालाच पुश फॅक्टर्स (ग्रामीण भागातून बाहेर काढणारे घटक) आणि पूल फॅक्टर्स म्हणजे (शहरांमध्ये आकर्षित करणारे घटक) असे म्हणतात. शहरीकरणाचा परिणाम शहरीकरणामुळे समाज आणि पर्यावरणावर परिणाम होतो तसेच शहरी पायाभूत सुविधांचा विकास होतो

**स्थलांतराची कारणे**

1. चांगले वेतन
2. नोकरीच्या संधी
3. शिक्षण आणि इतर सुविधा
4. आर्थिक कारणे

थोडक्यात शहरीकरण ही एक व्यापक प्रक्रिया आहे ती ग्रामीण ते शहरी स्थलांतरामुळे गतिमान होते विवाह हा महिलांच्या स्थलांतराचे प्रमुख कारण आहे कारण त्या आपल्या पतीच्या पाठोपाठ शहरांमध्ये वास्तव्यास येतात त्यामुळे स्थलांतरामध्ये महिलांचाही वाटा मोठा आहे.

'ऑल पोर्ट यांनी दिलेल्या माहितीनुसार परिस्थितीविषयक दृष्टिकोन'- या सिद्धांतानुसार जेव्हा एखाद्या स्थानाच्या एखाद्या स्थानाच्या 'स्थान उपयुक्तांचे मूल्य' इतर स्थानापेक्षा जास्त असते तेव्हा लोक स्थलांतर करतात

ऐतिहासिक दृष्टिकोन- जोसेफच्या म्हणण्यानुसार अंतर्गत आणि बाह्य दबावामुळे आणि प्रति दबावामुळे तसेच सामाजिक आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेतील संरचनात्मक परिवर्तनामुळे वेळोवेळी स्थलांतर होते.

कार्ल मार्क्स- असा युक्तिवाद करतात की भांडवलशाहीच्या विस्तारामुळे कामगार वर्गाचे दारिद्र्य हे सर्व प्रकारच्या स्थलांतराचे प्रमुख आधार आहे.

स्थलांतर प्रक्रियेचा मानवी जीवनाच्या आणि प्रदेशाच्या आरोग्य सामाजिक आर्थिक सांस्कृतिक धार्मिक आणि राजकीय पैलूवर निश्चित प्रभाव पडतो तसे पाहता स्थलांतराच्या मानवी जीवनाच्या विविध पैलू वर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास केला जातो परंतु त्यापैकी स्थलांतरितांच्या मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम ही एक महत्त्वाचे क्षेत्र आहे जे लोकांना आकर्षित करत आहे.

1932 मध्ये ऑर्डर गार्ड यांनी स्थलांतर आणि मानसिक आरोग्य यांच्यातील संबंध जाणून घेण्यासाठी एक संशोधन केले तेव्हा त्यांना असे आढळले की स्थलांतरित झालेल्या लोकांमध्ये मिनेसोटा युएसए नार्वे जी एन स्थलांतरित अनुवंशिक दृष्ट्या पूर्वस्थिती असलेले मनोविकार होते आणि नंतर

त्यांना क्रिझ्झोफ्रेनिया झाला त्यांनी असे निदर्शनास आणून दिले की जेव्हा लोक मानसिक आजारांना बळी पडतात तेव्हा त्यांना स्थलांतराच्या काळात विकार होण्याची शक्यता जास्त असते स्थलांतर प्रक्रियेत आणि स्थलांतराच्या काळात लोकांना येणाऱ्या विविध अडथळ्यामुळे स्थलांतर मानसिक आजारासाठी एक प्रेरक घटक बनते असे दिसून येते. स्थलांतराच्या संक्रमणकालीन काळात आत्मसन्मानात पुनर्मूल्यांकन आणि बदल होतात संशोधनातून असे सिद्ध झाले की आत्मसन्मान व्यक्तीच्या एकूण कार्यावर प्रभाव पडतो. शहरांमधील स्थलांतरामुळे निर्माण होणाऱ्या प्रमुख मानसशास्त्रीय समस्या:-

1. नैराश्य आणि चिंता. (Depression and Anxiety )
   नवीन वातावरणाची जुळवून घेताना उदाहरण नोकरी न मिळणे उत्पन्नाची अनिश्चितता आणि सामाजिक पाठिंब्याचा अभाव यामुळे नैराश्य व तीव्र चिंता जाणवते.

2. एकटेपणा
   गावातील ओळखीच्या लोकांपासून दूर राहिल्याने एकटेपणाची भावना वाढते आणि यामुळे सामाजिक संबंध तुटतात.
3. भेदभाव आणि उपेक्षितपणा (discrimination and marginalization)
   स्थलांतरितांना अनेकदा भाषा संस्कृती किंवा दिसल्यामुळे भेदभावाला सामोरे जावे लागते त्यामुळे आत्मसन्मान कमी होतो.
4. कौटुंबिक समस्या. (Family problem)
   कुटुंबापासून दूर राहणे कामाचा ताण आणि राहण्याच्या अपुऱ्या सोयी यामुळे कुटुंबात तणाव निर्माण होतो विशेष म्हणजे मुलांच्यावर भावनिक परिणाम होतात.
5. तणाव आणि संघर्ष. (Stress and conflict,)
   अपुऱ्या निवार्याच्या सुई अस्वच्छता आणि वाढत्या गर्दीमुळे येणारा ताण अनेकदा मानसिक आरोग्यावर परिणाम करतो
6. नोकरीची असुरक्षितता. (Job Insecurity)
   विशेषता असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या ंना कामाच्या तानातून जावे लागते त्यामुळे मानसिक त्रास वाढतो.
7. संज्ञानात्मक भार (Cognitive Load)
   नवीन शहरात राहण्यासाठी सतत नवीन गोष्टी शिकाव्या लागतात त्यामुळे मानसिक थकवा येतो.

**निष्कर्ष:-**

प्रस्तुत संशोधनातून शहरांमध्ये स्थलांतराच्या प्रक्रियेमुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबे शहराकडे स्थलांतरित झाल्यामुळे कमी जागेत अनेक लोक एकत्रित आल्याने मानसिक समस्या निर्माण झालेल्या दिसतात त्याचा परिणाम मानसिक आघात होऊन वैफल्य निर्माण होत आहे.

**संदर्भ :-**

1. खडसे भा. की. (2004) "भारतीय समाज आणि समस्या" हिमालय पब्लिकेशन मुंबई
2. डॉक्टर म न पलसाने डॉक्टर सविता नवरे 2003 उपयोजित मानसशास्त्र कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे.
3. रॉबर्ट बॅरोन ना यला ब्रेन्स कॉम डॉन बायरन गोपा भारद्वाज (2012) "सामाजिक मानसशास्त्र"पब्लिकेशन
4. जेम्स डी राईट (2015) इंटरनॅशनल इन सायकोपीडिया सामाजिक आणि वर्तनात्मक विज्ञान
5. गंगाधर बनसोडे 2023 साप्ताहिक साधना.
6. डॉक्टर चारुलता प्रधान "बहु ज्ञानशाखीय विचार प्रवाह" (2014) न्यू वोॅईसेस पब्लिकेशन औरंगाबाद.